To श्री अशोकभाऊ


स्त्री चळवळीला वाहिलेले ज्वलंत मुखपत्र

साप्ता.

# स्त्री समाचार

पोस्टाचा परवाना जे.ए.एल. 49/15-17

साप्ता. स्त्री समाचार R.N.I.No. 71752/99

Email : strisamachar@gmail.com

संस्थापक संपादिका - सौ. अंजनी आर. बडगुजर, कार्यकारी संपादक - प्रा.आर.एस.बडगुजर, अयोध्यानगर, जळगाव. फोन : २२११६३१,मो.९४२२८२२८७९

वर्ष २२ वे | अंक ११ | शनिवार, दि. १०/६/२०१७ | डाक सोमवार, दि. १२/६/२०१७ | पृष्ठ ४ | किंमत १ रु.


## सदैव हसतमुख, प्रसन्न चेहरा, दिलदार व्यक्तीमत्वाचे

## स्व. कांतीभाऊ जैन



जैन उद्योग समुहाचे संस्थापक आदणरणीय भंवरलाल जैन यांचे लहान बंधु व सेवादास व महाविर बँकेचे चेअरमन दलुभाऊ जैन यांचे पुतणे व अभय जैन, अविनाश जैन यांचे पिताश्री कांतीभाऊ जैन सदैव हसतमुख, प्रसन्न चेहरा, कुशाग्र बुध्दीमत्तेचे धनी, अत्यंत दिलखुलास स्वभाव. जैन उद्योग समुहाच्या संस्थापक सदस्यांपैकी ते एक होते. त्यांचे संपुर्ण आयुष्य दिलखुलास पणे जगत असतांना अचानक ते आपल्याला सोडून गेले ही एक दु:खद घटना. आदरणीय मोठे भाऊ व कांतीभाऊंचे राम-लक्ष्मणा सारखे आदर्शवत बंधु प्रेम होते. भाऊंच्या जाण्याचा परिणाम त्यांच्यावर झाला. अंत्यविधी समयी अभय, अविनाश नातु आर्यन, पुतणे अशोकभाऊ, अनिलभाऊ, अजितभाऊ, अतुलभाऊ, माजी मंत्री सुरेशदादा जैन, अरुणभाई गुजराथी, कवीवर्य ना.धो.महानोर, आमदार गुरुमुख जगवाणी, जिल्हाधीकारी किशोरराजे निंबाळकर, पोलीस अधिक्षक डॉ.जे.डी. सुपेकर, रतनलालजी बाफना, उद्योजक रजनिकांत कोठारी, रविंद्र भैय्या पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

### दलूभाऊ जैन - हसतमुख स्वभावाचे कांतीभाऊ



कांतीभाऊ हसतमुख, दिलदार स्वभाव के थे। कांतीभाऊके बारें में हम जितना भी बोले, जितनाभी कहे, सुने कम है। हमारा बडा लंबा साथ रहा है। एक हासरा, बोलनेवाले, मजाक करने वाले कांतीभाऊ हमारे परिवार को छोडकर चले गये यह एक दु:ख है। बंधु प्रेम कैसा होना चाहिए इसका आदर्श उदाहरण बडेभाऊ और कांतीभाऊ थे। प्रतिकुल परिस्थिती में भी दोनो भाईयोंने साथ नहीं छोडा।

### अशोक जैन- कांतीभाऊकां हमे हमेशा प्रोत्साहन



कांतीभाऊ हमारे चाचाजी। मिलनसार, हसतमुख, शांत ऐसा उनका व्यक्तीमत्व। जैन उद्योग समुहकी उन्नती में उनका महत्वपूर्ण योगदान। उन्होंने हमेशा हमें प्रोत्साहीत किया। एक आदर्श व्यक्तीमत्व उन्होने दिये हुए उन्नतीकी मार्ग पर हम हमेशा चलते रहेंगे। उनका मार्गदर्शन हमें उन्नती के लिए हमेंशा पथदायी होगा।

मी परमेश्वराचा खुप खुप आभारी आहे. त्याने वडील हिरालालजी जैन, आई गौराबाई जैन, बन्सीभाऊ जैन, दलुभाऊ जैन, शिवराजभाऊ जैन या जैन परिवारात मला जन्माला घातले परिणामत: या परिवाराच्या संस्कारात मी वाढलो. भंवरलालजी जैन रामा सारखे बंधु मला लाभले. या संस्कारात वाकोदच्या भुमित मी वाढलो. या परिवारातच माझं संपूर्ण आयुष्य कष्टाच बाळकडू मी ताऊन-सुलाखुन प्यालो. या विश्वात या परिवाराने आपले नांव उज्वल केले. हे विश्वची माझे घर मानुन प्रेमाचा वर्षाव केला. प्रेमाचा स्विकार केला. प्रेमाच्या नात्या पेक्षा रक्ताच्या नात्याला श्रेष्ठ मानले. माझे जीवन सार्थकि लागले. आयुष्य जगत असतांना माझ्यावर भरभरुन प्रेम केलं. त्या प्रेम सागरात मी जिवनाला समृध्द केलं. जन्म मृत्यूच हे चक्र चालूच राहणार. आपण किती जगलो या पेक्षा कसं जगलो हेच शेवटी अमर राहणार.

भडे भाऊ का भाई होने का मुझे बडाही गर्व है। मै भाऊ के बारे में इतना ही कहूंगा। मेरे शरीरके चमडेकी चप्पल भी बनाके उनके पैरमें पहना दूं तो भी कम होगी। क्यों की उन्होंने मुझे जो कुछ दिया है, आप सबको मिला नहीं। मैं आपसे ज्यादा भाग्यवान जरुर हूं। पर इस बातमें की मै उनका भाई करके जन्माया। मेरे माता पिता की कृपा थी इस लिए मुझे ये जन्म मिला और मुझे ऐसा महान भाई का भाई होने का सौभाग्य मिला। इस सौभाग्य में बचों ने भी मुझे उतनाही साथ दिया। जितना भाऊ ने दिया था और दे रहे है। मैं ६० बरस से उनके साथ में हू। वो एक वृक्ष की तरह मेरे उपर छाये रहे, छाते के मुताबिक, उसकी छाँया के मुताबिक उनका साथ निभाया और निभाते रहे हैं। बचों के साथ में भी वैसाही सहयोग रखेंगे ऐसा मैं उनको आशिर्वाद देता हूँ।

### आमचे वडील कांतीभाऊ आमचे प्रेरणा स्थान






अंजली सुशिल पारख,नाशिक,मो.८३९०९०२११४
अरुणा नितीन तोडरवाल, नाशिक,मो.९२२५१२६४१७,
आरती विनय कस्तुरे, पुणे,मो.९२२५५२००३०

कांतीभाऊ आमची वडील त्यांनी आम्हाला योग्य दिशा दिली. आमच्या सुप्त गुणांना वाव दिला. त्यांचा शांत, प्रेमळ, सहकार्याचा स्वभाव, स्पष्ट वक्ते, स्वाभीमानी, स्वतंत्र विचार सरणीचे, सत्यवादी. ते नेहमी स्वत:च्या व इतरांच्या आरोग्याची काळजी घेत. त्यांनी मुलीप्रमाणे जावांवर प्रेम केले. प्रत्येकाची चुक त्यांनी निदर्शनास आणुन ती दुरुस्त करावयास योग्य तो सल्ला दिला. प्रेमा पोटी त्यांनी कधीही चुकीच्या गोष्टीला वाव दिला नाही. त्यांनी जावई शोधतांना कर्तुत्वाला, शिक्षणाला पैशा पेक्षा परीवाराला महत्व दिले. परीवराच्या उन्नतीत आई शकुंतला ह्यांचे मोलाचे योगदान.

अंजुताई - आपल्या मुलांची उंची कमी आहे असे लक्षात आल्यानंतर ३२ वर्षा पुर्वी १९८६ मध्ये पुणे येथील नामांकीत डॉक्टरांकडे योगासने व औषधोपचार केल्याने उंची वाढेल हे कळताच उन्हाळयाच्या सुटीत आम्हा पाच ही भावंडांना आमच्या आई सह पुणे येथे नेले. पुण्यात आम्ही एकानामांकीत हॉटेल मध्ये पंधरा दिवस वास्तव्य केले. आमच्या उंची वाढण्या बाबत प्रयत्न केलेत. भाऊंना वाटायचे आमच्या मुलांच्या सर्वांगीण विकास व्हावा.

अरुणाताई :- माझी मुलगी प्रेक्षा हिला १० वीच्या आय.सी.एस.ई.च्या परीक्षेत ९६ % मार्क मिळाले ह्याचा भाऊंना खुप आनंद झाला त्यांना आपल्या माती बद्दल गर्व वाटायचा. प्रत्येकाला ते ही गोष्ट सांगत ''भाऊंनी नेहमी शिक्षणा बाबत नातवंडाला प्रोत्साहन दिले. आपला हुशार नात वंशचा त्यांना गर्व होता. मुलांनी जास्तीत जास्त गुण मिळवुन उच्च शिक्षण प्राप्त करावे. असे त्यांना वाटायचे. आपल्या नाती उच्च शिक्षण घेवुन जास्त गुण मिळवू शकतात. ह्या बद्दल त्यांना आत्मविश्वास होता.

आरतीताई -
माझी मुलगी सौम्या व तनिष्का ह्यांच्यावर आमच्या प्रमाणेच भाऊंचे अतोनात प्रेम त्यांनी दोघांमधील वेगवेगळ्या सुप्त गुणांना वाव दिला व त्यांची मनसोक्ती त्यांची प्रशंशा केली. जेव्हा सौम्याने सुंदर जिम्नॅस्टीक करुन दाखविले तेव्हा आनंदीत होऊन प्रशंसा केली व तनिष्काने जेव्हा अभ्यासात उत्कृष्ठ गुण मिळविले तेव्हा देखिल भाऊ तेवढेच आनंदीत झाले.


गौराबाई हिरालाल जैन


कांताबाई भवरलालजी जैन


डॉ.पद्मश्री भवरलालजी जैन

**सुविचार :** खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे - साने गुरुजी


## संपादकीय — प्रेमळ, शांत, हसतमुख चेहऱ्याचे कांतीभाऊ जैन

कांतीभाऊ जैन यांचा अनेक वर्षांच सहवास. ते जैन उद्योग समुहाचे संस्थापक सदस्य. जैन उद्योग समुहाच्या वाटचालीत त्यांचा मोलाचा सहभाग. हसतमुख, प्रसन्न विनोदी शैलींचा स्वभाव असे त्यांचे व्यक्तीमत्व. प्रत्येकाला आनंदी ठेवावे, प्रसन्न ठेवावे, मदत करावी असा त्यांच्या स्वभावाचा स्थायी भाव. नम्रता हा त्यांच्या स्वभावाचा महत्वाचा पैलू. मैत्रीची भावना त्यातून त्यांचा मोठा लोक संग्रह. भरपूर वाचन त्यामुळे भाऊ म्हणजे समृध्द असा शब्दकोष अनुभवाचा, विचाराचा साठा. भाऊंच्या सानिध्यात जो-जो आला त्याला-त्याला भाऊंनी मदत केली. त्यामुळे भाऊंबद्दल प्रत्येकाच्या मनात मानाचे स्थान. त्यांच्या निधनाने एक सन्मीत्र हरपला.

# आता उरल्या फक्त आठवणी


कांती भाऊ जैन

प्रा. रमेश एकनाथ झोपे, चंद्रकिरण,
१५/१, भुषण कॉलनी, जळगांव
मो.नं. ९८२३४३२२६४


प्रा. रमेश झोपे

सर्वांचे कांती भाऊ, परंतु माझा मात्र कांतिलाल. हो, मी त्याला कांतिलाल किंवा कांतीच म्हणायचो. कारण तो माझा सर्वात जवळचा मित्र होता. खरा मित्र होता. कामा पुरता किंवा फक्त दाखविण्यापुरता किंवा म्हणण्यापुरता मित्र नव्हता. खुप-दुःखात आणि वेळ आल्यास मदतीला धावुन येणारा होता. म्हणुनच मी त्याला कांतिलाल किंवा कांति म्हणायचो.

आमची ओळख सन १९५८ मध्ये. आम्ही नवव्या इयत्तेत आर.आर. विद्यालय, जळगांव मध्ये शिकत असतांना झाली. मी, कांतिलाल आणि लिमुमल ललवाणी असे तिघे जण मित्र बनलो. आमची मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आम्हा तिघांची ही घरची परिस्थिती साधारण, गरिबीचीच होती.

कांतीभाऊ त्यावेळेला तिजोली गल्ली मध्ये रहात. आम्ही त्या काळात फिरायचो व अभ्यास ही करायचो, भरपूर अभ्यासा मुळे आम्हाला एस.एस.सी परिक्षेत चांगले मार्क मिळाले. एस.एस.सी. झाल्या नंतर मी पुण्याला अॅग्रीकल्चर कॉलेजला गेलो. लिमुमलने छोट्या प्रमाणात रेडिमेड कपड्यांचा व्यवसाय सुरु केला. मोठ्या भाऊंनी पोलन पेठेत दुकान घेऊन रॉकेल, खते-बी बियाणे, नंतर गॅसची एजन्सी असा व्यवसाय सुरु केला. इंदौर येथुन परिक्षा देऊन कांतिलाल दुकानावर बसुन मोठ्या भाऊंना साथ देवु लागला. पुढे लिमुमलने भावांच्या मदतीने कापडाचे मोठे दुकान टाकले. भाऊंनी धंद्यात खुपच प्रगति केली. मी नोकरीला लागलो. आमच्या तिघामित्रांत श्रीमंतीच्या बाबतीत मीच सर्वांत गरीब होतो. असे होते तरी आमचे मित्रत्वाचे संबंध कायम राहिले. कांति आणि लिमु दोघांनाही पैशाचा अभिमान कधीही स्पर्श करु शकला नाही. मित्र म्हणजे मित्रच. याचे एक उदाहरण म्हणुन एक प्रसंग सांगता येईल. त्यावेळेस जैन ब्रदर्सचे दुकान व ऑफीस पोलन पेठेतच होते. त्यात पार्टीशन करुन एका बाजूला कांतिलालची ऑफीसची खोली केलेली होती. खोलीत एक टेबल व एकच खुर्ची होती. एकदा मी त्याला भेटावयास गेलो असता खुर्चीवर बसुन आम्ही गप्पा मारीत होतो. तेवढ्यात त्याच्या चेंबरमध्ये आमचे विद्यापीठाचे माजी संशोधन संचालक जैन ब्रदर्समध्ये नोकरीस होते, ते आले. माजी संशोधक संचालक म्हणुन मी खुर्चीतुन उठणार तोच कांतिलालने मला बसण्याची खूण केली व बेल वाजवून शिपायाला दुसरी खुर्ची आणायला सांगितले. दुसरी खुर्ची येई पर्यंत ते उभेच होते. ते उठुन बाहेर गेल्यानंतर कांतिलाल मला म्हणाला, ते भले ही तुझे माजी संशोधन संचालक असतील. पण आज ते आमच्या येथे नोकरीला आहेत. तु माझा मित्र आहेस. तु मला त्यांच्यापेक्षा जवळचा आहेस. म्हणुनच मी तुला खुर्चीत बसून राहण्याची खूण केली. याला म्हणतात मित्राची कदर जाणणे.

मी सोलापुरला बदली वर असतानाचा प्रसंग. एके दिवशी दुपारी चार वाजेच्या सुमारास एक रिक्शा आमच्या घरासमोर थांबली. रिक्शाच्या मागे एक मोठी व्हॅन होती. आम्ही खिडकीतुन डोकावुन पाहिले आणि आम्हाला आश्चर्यच वाटले. रिक्शातुन कांतिलाल उतरत होता. पैसे घेऊन रिक्शावाला निघुन गेला. मी त्याला विचारले, असा अचानक कसा आलास, मला निरोप दिला असता तर मी घ्यायला आलो असतो ना. त्यावर तो म्हणाला, वेळ फार कमी आहे. माझ्या बरोबर इतरही बरीच मंडळी आहे. तुला त्रास देण्यापेक्षा रिक्शावाल्यास पत्ता सांगितला आणि त्याच्या मागोमाग व्हॅन आणायला ड्रायव्हरला सांगीतले. रिक्शावाल्याने अगदी बरोबर तुझ्या घरी आणुन सोडले. आपली भेट होण महत्वाच आहे. बराच वेळ आम्ही गप्पा मारल्या. नंतर तो व्हॅनने निघुन गेला. असा हा माझा मित्र कांतिलाल. मी रिटायर्ड झालो. जळगावला भुषण कॉलनीत स्थायिक झालो. कांतिलालने गिरणा नदीकाठी एक फॅक्टरी व मॉल टाकला होता. आता सुध्दा आहे. मॉल माझ्या घरापासुन साधारण पणे ६ किलोमिटर अंतराव हायवेवर आहे. मला केव्हाही मॉलवर कांतीला भेटावयास जायचे असल्यास तो मला घ्यायला गाडी पाठवित असे व गाडीतच घरी सोडत असे. हायवे ने स्कूटी घेऊन मॉलवर मला त्याने कधीच येवु दिले नाही. आपल्याकडे गाडी असल्यावर स्कूटीने येण्याची रिस्क का घ्यायची असे त्याचे म्हणणे असे. जर मी त्याला घरी फोन करुन सांगितले की, आज मॉलवर जाताना माझ्या घरी मला भेटून जा. मला तुझ्याशी कांही बोलायचे आहे. तर तो माझ्या घरी मला भेटून जात असे. त्याने यात कधी ही कमी पणा वाटून घेतला नाही. माझ्या मुलीच्या लग्नात तो वहिनींसह लग्नाला आला वधु-वरांना आशीर्वाद दिला. सर्वांना खूप आनंद झाला. खूप खूप वर्षेजगण्याची त्याची प्रबळ इच्छा शक्ति होती. त्याला जर आपण म्हटल, तु एवढे वर्षेजगुन काय करशिल, बायका मुले, मित्र मंडळी सर्व निघून जातील. तु एकटाच राहाशिल. त्यावर तो म्हणायचा, ज्याला मरायच असेल त्याने मरावं. मला मात्र खुप खुप जगायच आहे. खुप काम करायची आहे. आहे त्या पैशांचा समाजासाठी, गरिबांसाठी, गरजुंसाठी उपयोग करायचा आहे. वृध्दाश्रम, गरिबांसाठी दवाखाना, शाळा व इतर सामाजिक कार्य करायची आहेत. पण सर्वच गोष्टी मनातल्या मनात राहून गेल्या. मोठ्या भाऊंवर लक्ष्मणासारखे प्रेम करणार दुसऱ्यांवर प्रेम करणारा, गरिबीची, गरिबांची जाणीव असणारा, दुसऱ्यांना केव्हाही मदतीचा हात देणारा, श्रीमंतीचा थोडाही अभिमान नसणारा, सामाजिक भान असणारा. साहित्य प्रेमी, कविहृदय असणारा, हसतमुख, दुसऱ्यांच दुःख जाणुन घेणारा. सर्वांची मत ऐकुन घेऊन, स्वतःच्या मनाला जे योग्य वाटेल त्याप्रमाणे जगणारे असे व्यक्तिमत्व होतं कांतिलालचं. आज जरी कांतिलाल शरिर रुपाने माझ्या जीवनात नसला तरी त्याच्या बद्दलच्या स्मृति माझ्या स्मरणात सदैव राहतील.

## प्रेमळ मनमिळावू स्वभावाचे कांतीभाऊ






प्रेमदादा रायसोनी, सौ. विमल रायसोनी
१५, प्रताप नगर, जळगांव. मो. ९४२३४ ८९८७०

सौ. शकुंतला ही माझी दोन नंबरची बहिण तिचे शिक्षण माझे कडे झाले कांतीभाऊंची तिचे लग्न १९६६ मध्ये झाले भंवरलालजी जैन हे अॅड. उत्तमचंदजी रायसोनी येत. कांतीभाऊ हे भवरलालजींचे लहान बंधू कांतिभाऊ लहानपणा पासुन हुशार मोठा त्यामुळे ते भंवरलालजी सोबत व्यापारात. मनमिळावू हसतमुख व्यक्तीमत्व अभ्यासू वाचन छंद त्यांच्या बोलण्यातून अभ्यासू पणा व्यक्त व्हायचा. जैन फुड पासुन व्यवसायाला सुरवात व्यवसायाचे धडे बडे भाऊ भंवरलालजी जैन ह्यांचे कडून घेतले. प्रत्येकाला ते आपले समजत. विनोद स्वभावा मुळे. कोणतीही गोष्ट जास्त मनावर घेत नव्हते. प्रत्येकाच्या सुख दुःखात समरस व्हायचे व्यवसाया सोबत सामाजीक अध्यात्मीक कार्यात योगदान प्रामाणीक पणा कष्टाला महत्व प्रत्येकाच्या सुख दुःखात मदत. नम्रता त्यांच्या अंगी प्रत्येकाचे हसत मुखाने स्वागत, विनोदी स्वभावाने प्रत्येकाशी ते समरस होत असत. परीवाराच्या उन्नतीत शकुंतलाताईची सोबत. ती देखिल कष्टाळू प्रेमळ सतत कामात मग्न नाते जपणारी. संयुक्त परीवारात ते बराच दिवस. संयुक्त परीवार असावा अशी त्यांची मनापासून इच्छा. भवरलाल जैन ह्यांचे निधनाचे दुःख त्यांनी मोठ्या मनाने सहन केले. मोठ्या मनाचा मनुष्य त्यांच्या जाण्याने रायसोनी परीवाला एक धक्काच बसला. प्रेमळ मनमिळावू विनोदी, दिलदार स्वभावाचे, कांतीभाऊ. त्यांना गरीबां विषयी आस्था कणव.

प्रत्येकाच्या हृदयात त्यांच्याबद्दल मानाचे स्थान.



### मिलनसार कांतीभाऊ

प्रशांत संघवी, जळगांव. मो. ९४२३९ ७४५१३ कांतीभाऊ हमारे मार्गदर्शक,उनका सकारात्मक दृष्टीकोण, दिलदार, मिलनसार व्यक्तीमत्व, हमारे मार्गदर्शक.

### प्रेमळ स्वभावाचे कांतीभाऊ

एस.व्ही. पाटील, ५०, ओंकार नगर, पारीख पार्क जवळ, जिल्हा पेठ, जळगांव. कांतीभाऊ आनंदी, मनमोकळ्या मनाचे, प्रेमळ, सर्वांना मदत करणारे. आमच्या सारख्या लोकांना त्यांचा सहारा होता. एक प्रेमाचा सखा हरपला, ते नेहमी मला सोबत न्यायचे.

# आनंदी मनाचे कांतीभाऊ जैन



डॉ. सुभाष चौधरी,
प्रताप नगर, जळगांव.

कांतीभाऊ नम्र, शांत, प्रेमळ स्वभावी, हसतमुख चेहरा, सदैव प्रत्येकाला मदत. नेहमी सकारात्मक दृष्टीकोण.




शांतीलाल जैन, घोरपडे चक्की, यश लॉन जवळ, जळगांव.
कांतीभाऊंसोबत अनेक वर्षाचा सहवास. त्यांनी मला मुला सारखे प्रेम दिले. त्यांच्या मार्ग-दर्शन खाली माझी वाटचाल.



## फुफासाहब शांत, निर्मल, सरल स्वभाव के धनी थे।



सौ. भारती रायसोनी, जळगांव.
पुज्य फुफासाहब शांत, निर्मल, सरल स्वभाव के धनी थे। उनके हर काम में सादगी और सरलता थी। वे वाचन समृध्द थे। उन्होने पढा हुवा वह हमेशा सुनाते थे। पढने के साथ उन्हे गाने का भी शौक था। किसी अच्छी बात के वह तुरंत सराहना करते थे। फॅमिली के कोई भी छोडे बडे कार्यक्रम में वह आनंद से उपस्थित रहते थे। उनसे हमें कई बाते सिखने को मिली। हमारे सर पर उनका हमेंशा साया था।






आदर्श वत हमारे मासाजी ,सौ. संगीता संघवी, जळगांव.
हमारे मासाजी हमें हमेशा हँसाते थे, हसते रहते थे। अध्यात्म में उनका योगदान। हमारी उन्नती में उनका महत्वपूर्ण योगदान। शांत स्वभावी, उनकी हमेशा सभी को मदत। हमारे मासीजी का उनकी उन्नती में महत्वपूर्ण योगदान। भरा हुआ परीवार छोडकर मासाजी चले गये, यह सब के लिए दु:ख दायी घटना।



## दादाजीनें दीए हुए संस्कारो पे हम बडे हुए।

अनन्या जैन, प्यारे दादा बहोत साथ चाहीए था आपका। बहुत प्यार चाहिए था आपका। क्यो इतने जल्दी आप हमें छोडकर चले गये। आपले किए हुए संस्कारों पें हम आगे बढेंगे। हम दादी साँ का अच्छा खयाल रखेंगे।



## नानाजींच्या सुसंस्काराचा वसा, वारसा सदैव जपू



आकांक्षा पारख, प्रिय नाना सा आप आज नाहीत ही कल्पना सहन होत नाही. कोण म्हणते की आपण गेलात. आपण आमच्यावर भरभरुन प्रेम केलं, खुप-खुप शिकवलं, मायेन प्रेमाने मोठं केलं. आम्ही सदैव आपले आचार विचार आचरणात आणू. आजींवरही भरभरुन प्रेम केले.

## नानाजीने हमें जिंदगी का सही अर्थ सिखाया।



प्रेक्षा तोडरवाल, नानाजीनें हमें जिंदगी का सही रास्ता सिखाया। नाना आप वृक्ष के समान हो। जो भी आपने बताया उसे हमने अपनाया। हम परिवार का नाम रोशन करेंगे। आप के हर स्वप्न को साकार करेंगे। आप ने हमें जिंदगी में चलने का जो रास्ता बताया उसी रास्ते से हम आगे बढेंगे। एकदुसरेको साथ लेकर आगे बढेंगे।

## एकजुटता अपनापन का अनोखा प्रतिक कांतीभाऊ

प्रिया मुथा- आदरणीय ब्यायजी साहब एक सरल, शांत, हसतमुख मिलनसार व्यक्तीमत्व। हमारा भाग्य है आप हमें मिले। आप परिवार की एकजुटता स्नेह अपना पन अपने आप में सबके लिए एक अनोखा प्रतिक है।



## साप्ताहीक स्त्री समाचार सन्मान २०१७



कांतीलालजी जैन, कांतीभाऊ,
वडील हिरालालजी,
आई गौराबाई, बन्सीभाऊ,
दलूभाऊ, शिवराजभाऊ,
भंवरलालभाऊ जैन परिवाराचे
कष्ट, प्रामाणिकपणा,
हे विश्वची आपले घर, असे संस्कार आपणावर.
आपण प्रेमसागर, दयासागर,
शांतीसागर,साधी राहणी,
उच्च विचार सरणी.
सर्वांच्या हृदयात, आपल्या बद्दल मानाचे स्थान.
जैन उद्योग समुहाच्या उन्नतीत,
आपला मोलाचा सहभाग.
नभागत आपल्या उत्तुंग व्यक्तीमत्वाला,
करतो आम्ही सन्मान





प्रा.आर.एस. बडगुजर
सौ. अंजनी बडगुजर,
साप्ता. स्त्री समाचार,
अयोध्या नगर,जळगांव.
फोन नं. ०२५७-२२११६३१



डॉ. रमेश मुरलीधर चव्हाण
मो.नं. ७७४४००२७३२
कांतीभाऊंचा २१ महिन्या पूर्वी मेडीकल अटेडन्स् म्हणून माझी निवड करण्यात आली. मला खुप आनंद झाला. भाऊंचे कार्य खुप महान होते. भाऊंचा स्वभाव मन मिळावू होता. भाऊंचे माझे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते भाऊ आणि मी एकमेकांशिवाय राहत नव्हतो. नेहमी भाऊ मोठ्या भाऊंचा आदर्श डोळ्यासमार ठेवूनच होते. भाऊंना प्रत्येकाची जाणीव ठेवत होते. भाऊंनी मला कधीच नोकर किंवा परका समजत नव्हते.



# भरभरुन प्रेम करणारे कांतीभाऊ




डॉ. शेखर रायसोनी, रायसोनी हॉस्पीटल, जळगांव मो. ९८२३०७३७३४ कांतीभाऊंचे माझ्यावर भरपूर प्रेम. ते माझ्या कडे येत, भरपूर गप्पा व्हायच्या त्यांचे माझेवर मुलासारखे प्रेम. एक चांगले मार्गदर्शक, कुशाग्र बुध्दी, स्पष्ट वक्ता, प्रेम, मनमिळावू, शांत स्वभाव. ते मला विश्वासाने सल्ला देत.






**नम्र स्वभावी कांतीभाऊ**, सुरेशदादा जैन, ७, शिवाजी नगर, जळगांव.

कांतीभाऊं का स्वभाव नम्र, मिलनसार। हसी मजाक करने का उनका स्वभाव जीवन को कांतीभाऊ बडे आनंद से जिनेका प्रयत्न करते थे। कांतीभाऊ एक निर्मल व्यक्तीमत्व एक अच्छे परिवार का नैतृत्व कांतीभाऊ हमारे में नही रहे यह हमारे परिवार के लिए दु:खद घटना है।





**काका का हमें हमेशा प्रोत्साहन** अनिल जैन, जैन उद्योग समुह, जलगांव

कांतीभाऊ हमें काका के रुप में मिल यह हमारा सौभाग्य है। काकाजी बहोतही अनोखे व्यक्तीमत्व थे। वह एक जिंदादिल व्यक्ती की पेहचान हमारे सब के लिए थी। काका हमेशा हमेशा हँसाते थे खिलाते थे। इंदौर में डिग्री लेने के बाद बडेभाऊ के साथ में काम में जुड गए। काकाजी जैन ब्रदर्स के फाऊंडर थे। प्रोडक्ट सेल करने के लिए ग्राहक के साथ उन्होने अच्छे रिलेशन शिप बढाई थी। अपने बडे भाई भंवरलालजी जैन इनके बारे में उनको बहोत नाज था, अभिमान था, प्यार था। दोनो भाई की जोडी राम-लक्ष्मण जैसी थी। फॅमेली कल्चर के बारे में कभी भुलना नहीं; इस की हमें याद देते थे। दुनिया की बारे में उनका नॉलेज गहरा था। आदर्श पिता, आदर्श काका, आदर्श परिवार का उनका नैतृत्व था।



**प्रेमळ स्वभावाचे कांतीभाऊ** गिरधारीलाल ओसवाल, वर्धमान नगर, जळगांव.

कांतीभाऊ विनादी स्वभावाचे, शांत, मनमिळावू. आमच्या कडे ते नेहमी येत आरोग्या बाबत काळजी घेत. एकदा तर माझी प्रकृती बरी नसल्यामुळे ते मला हॉस्पीटलला घेऊन गेले. ते माझे चांगले मित्र. परमेश्वराने माझ्या चांगल्या हसतमुख मित्राला माझ्या पासून हिराऊन घेतले. वाईट वाटते. भाऊंना वाचनाचा छंद होता.





नेक इन्सान कांतीभाऊ , दौलत मलजी जैन, १०, आदिनाथ सोसायटी, शिवराम नगर, जळगांव. फोन ७७७४०६०८६०. कांतीभाऊ बडे नेक इन्सान, मिलनसार स्वभावी, स्पष्ट वक्त, निस्वार्थ। परिवार में, समाज में उनका महत्वपूर्ण स्थान। मेरे घने मित्र, नेक सलाहकार। मै जलगाँव जबसे आया तबसे कांतीभाऊ मेरे मित्र। उनका मुझे सहारा मिला। उनके कारण मै जलगाँव में टिका। मेरे सुख-दु:ख में उनका सदैव सहयोग। उनका हसतमुख चेहरा। हमें प्रोत्साहन देता था। मजाकी स्वभा के कारण मै दु:ख भुल जाता था। उनके सदा साधीरहन, उच्च विचार धारा थी। कांतीभाऊ के मिलने से जिवन में रौनक थी।कांतीभाऊ के जाने से मै मेरे घनीस्ट हसीले दोस्तो को खोबैठा।




**प्रेमळ मायेचा हात** डॉ. राकेश मोहन बढे

प्लॉट नं. २७६२, कोहीनुर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प) मुंबई

मो. ९८२०००३३७०


प्रेमळ मायेचा हात आणि जळगावचा महान भुमीपुत्र






**दिलदार प्रेमळ कांतीभाऊ** डॉ. अर्जुन भंगाळे, पारीख पार्क, जिल्हापेठ, जळगांव. मो. ९९६०६०६१८०

१९६६ पासून अत्यंत जवळचे संबंध, निर्मल मनाचे. माझ्या मुलासारखे त्यांचे प्रेम दिलदार व्यक्तीमत्व. त्यांनी माझ्यावर नेहमी प्रेम केले. ते माझ्या सु:ख दु:खात नेहमी सहभागी होत असत.



**आजोबांचे नेहमी प्रोत्साहन** आर्यम अभय जैन, मो. ९५४५७५००५७ आर्यम व्यंकटेश कॉलनी, समता नगर रोड, जळगांव.

कांतीलालजी जैन माझे आजोबा. माझे आजोबा हे खुप वेगळ्या व्यक्तीमत्वाचे होते. आम्हाला चांगल्या गोष्टी शिकवायचे व आचरणात आणावयास सांगितले. परीवाराला घेवुन कले चालायचे ते शिकविल व परीवाराला जोडून ठेवण्यासाठी प्रोत्साहन देत.





**भाऊंचा सदैव मदतीचा हात** अमरजा नाईक बेलसरे, बी-५/६०१ अलकॉन, रेलीसान, युआन, आयटी पार्क जवळ, खराडी, पुणे., कांतीभाऊंचे नाईक परिवारावर अतोनात प्रेम, माझे आजोबा जी.एच.नाईक व जैन परीवाचे स्नेहाचे संबंध कांतीभाऊंचा स्वभाव प्रेमळ नेहमी मदतीचा हात.

लेखकाच्या मताशी संपादक असतीलअसे नाही. (हे वृत्तपत्र मालक, मुद्रक,प्रकाशक व संपादक प्रा.रामकृष्ण शंकरराव बढगुजर यांनी नंद रुलर्स अॅन्ड प्रिंटर्स, ९०अ, औद्योगीक वसाहत, जळगाव येथे छापून अयोध्यानगर,जळगाव येथे प्रसिध्द केले.